**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 11 | July 2015**
**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *'' पेशवे काळातील दागदागिने व अलंकार एक ऐतिहासिक विश्लेषण ''*

*स्वाती निवृत्ती बदामे*

संशोधक विद्यार्थीनी , एम.ए., (इतिहास), बी.एड.एम.फील.
पीएच.डी.स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेड.

*प्रस्तावना :*

पेशवेकाळातील ऐतिहासिक साधनांचा आणि कागदपत्रांचा अभ्यास करताना अनेक ठिकाणी दागदागिन्यांचा उल्लेख आपणास दिसून येतो. सरदारकीचे वस्त्रे बहाल करताना एखाद्या लढाईत मर्दुमकी गाजविल्यानंतर बक्षीस म्हणून किंवा बादशहा, सरदार आणि राजे किंवा महापुरूषांच्या दर्शनाला जाताना एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देताना निरनिराळे दागिने, नजराणा अथवा भेट म्हणून देण्याची परंपरा त्याकाळात होती. छत्रपती शाहूंनी अनिर्बंध असे अधिकार पेशव्यांना दिल्यामुळे हळूहळू साताऱ्याचे सत्ताकेंद्र पुण्यातच निर्माण झाले. दागदागिन्यांच्या निर्मितीला अतिशय संपन्न असा काळ पेशव्यांच्या हौसेमुळे व चोखंदळपणामुळे निर्माण झाला. शाहूने स्वतः महाराष्ट्रात आल्यानंतर प्रोत्साहन देण्यासाठी अनेक सरदारांचा वस्त्रे, अलंकार व दागिने देऊन बहुमान केला.

छ. शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांची योग्यता पाहून त्यांनी त्यास मुख्य प्रधानपदाची वस्त्रे दिली. त्यावेळी ''जवाहिर, शिरपेंच, तुरा कंठी, चौकडा'' असे अलंकार देऊन गौरविले. तसेच शाहूनी ताराबाईशी रांगणा किल्ल्यावर लढत दिली तेंव्हा स्वतः शाहू घोडयावरून डोंगरावर चढले. डोंगरात घोडयाचा पाय घसरला तेंव्हा शेख मीरा यांनी महाराजांस घोडयावरून लगेच उतरून घेतले तेंव्हा शाहूंनी 'बहूत संतोषी होऊन वस्त्रे, मोत्याची तुरे व कंठया दिल्या'[१] असा उल्लेख येतो. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे दिली तेंव्हा नानासाहेब पेशवे व चिमाजी आप्पा या दोघांनाही मोत्यांचे तुरे दिल्याचा उल्लेख आहे. तो असा

'' तुरे मोत्याचे - रा. आप्पास तुरा १,
सर १६ दर सरास
मोत्यें सुमारे ५१ प्रमाणे मोत्यें ८१६
रा. नानास तुरा १ सर १८ दर सरास
मोत्यें सुमारे ४५ प्रमाणे मोत्यें ८१०
किंमत ऐकूण तुर २ मोत्यें सुमारे १६२६''[२]

थोरले बाजीराव पेशवे यांचे एक चित्र जयपुरी येथे आहे. त्यामध्ये त्यानी ''कर्णभूषणें, कलगीतुरा, मोत्यांचा हार इ. अलंकार परिधान केले आहेत''[३] त्यावरून बाजीराव पेशवे वापरीत असलेल्या अलंकारांची माहिती होते. तसेच पहिल्या बाजीराव पेशव्यांनी दिल्लीची मोहिम हाती घेतली तेंव्हा महमदशहा बादशहाने बाजीरावास ''खिलतउमदा व जिगा व सरपेच व मोत्यांची माळ व येक हाती व येक घोडा पाठविला''[४] सोन्याची कडी तर सरदारांचा पेशवे काळात नेहमीच बक्षीस म्हणून दिली जायची.

नाना पानिपतकडे भाऊंच्या मदतीला जाताना वाटेने विंध्याद्रीतील गोंड लोकांच्या राजास निमंत्रण करून त्यास श्रीमंतांनी वस्त्रे, अलंकार, कडी, शिरपेंच वगैरे नजराणा दिला व अशा रितीने त्यांस आपल्यात सामील करून घेतले.[५] त्याकाळात बक्षीस म्हणून वजनदार कडयांची लालूच दाखवून एखादे कठीण काम करून घेतले जात असे. दागदागिन्यांना त्या काळात अतिशय महत्व दिले जात असे. त्यामुळेच युध्दावर जातानासुध्दा दागिने बरोबर नेले जात असत. '' तिसऱ्या पानिपत युध्दाच्या वेळी भाऊसाहेबांबरोबरचे जडाव दागिने ४ शिरपेंच, ४ कंठया, रूपये ८००१७१''[६] गहाळ झालेले खर्ची टाकले.

चोरांचा बंदोबस्त करण्यासाठी सोन्याची कडी इनाम दिली जायची. बहुबाराव कोळी या चोराने असाच दंगा माजविला तेंव्हा त्यांच्या बंदोबस्तासाठी सदाशिव सोमनाथ यांच्या नावे सनद करून दिली. त्याच अलंकाराचे एक कलम होते ते असे –

'' कोळी मजकुराची बातमी राखोन शिरच्छेद करून आणाव अगर दस्त करून विसाजी केशव यांजकडे आणून हजीर करावा हजीर केल्यास कडीं सुमार
२ सोन्याची कडी
१० रूप्याची कडी
एकूण १२ कडी सदरहून लिहिल्याप्रमाणे काम झाल्यास दिली जातील '' [७]

पेशवेकाळात मोत्यांचा उपयोग खूप मोठया प्रमाणात केला जात असे. कानांत मोत्यांचा जोड, मोत्याचा चौकडा, गळयात मोत्याच्या माळा असा मोत्याचा मोठयाप्रमाणात उपयोग केल्याचे दिसून येते. '' जोडया च्यार येथे करूनच यात आहेत बाकी दोन खाली नवी मोत्ये घेऊन कराव्या बीस रूपयांत दोन जोडया मोत्यें घ्यावी''८ सदरारांचा बहुमान मोत्यांचा चौकडा देऊन केला जात असे. '' गोविंद शिवराम तात्यांचा काळ जाल्यावर श्रीमंत कैलासवासी माधवरावसाहेब यांनी नीळकंठराव यांस वस्त्रे व चौकडा बहूमान दिल्हा.''[९]

लग्नप्रसंगी तर दागिन्यांचे महत्व काही निराळेच असे. त्यातल्या त्यात थोरामोठयांच्या लग्नात तर दागिन्यांची नुसती रेलचेल दिसून येते. लग्नात केवळ स्त्रीयांच नाही तर पुरूष सुध्दा हौसेने अलंकृत होतात. सवाई माधवरावांच्या लग्नांच्या वेळी जो श्रीमंत पुजनाचा विधी झाला त्यावेळी '' श्रीमंताचे मस्तकीं शिरपेंच व कलगी व तुरा मोत्यांचा व कानांत चौकडा, गळयात मोत्याच्या व पाचेच्या माळा, हातात पोंच्या''[१०] अशी स्वारी सरकारची निघाली. सवाई माधवराव पेशव्याचे लग्न नाना फडणवीसांनी मोठया थाटामाटात केले. वरातीच्या वेळी '' लोकांनी सोन्या रूप्यांची फुले श्रीमंतांवर उडविली''[११] तसेच एखाद्या व्यक्तीकडून कागदपत्राची अदला बदल करायची असेल तर व्यक्तीस सोन्याच्या अलंकारांची लाच देवून त्यांच्या कडून कागदपत्रांची अदलाबदल केली जाई. '' जामदारास सोन्याचे कडे देऊन, जामदारखान्यातून रूमाल नेऊन यादी काढून येऊन, कमी यादी दुसरी लेहून रूमालांत घालून, मागती रूमाल जामदाराचे हवाली केला''[१२] असे सांगतो.

नाना फडणवीस हेही दागिन्याचे फार हौसी होते. त्यांच्या अंगावर सतत काही ठळक अलंकार असायचे. ''नाना फडणवीस आपले अंगावर पुष्कळ दागिने घालित. हातात पोहोंचली, कानात लांब पाचूचे लोलक, गळयात कंठा आणि बोटांत अंगठया असे अलंकार घालण्याची त्यांची वहिवाट होती''[१३] असा उल्लेख आला आहे. सुवर्णांची फुले उधळण्याची परंपरा पेशवाईतही चालू राहिली होती. दुसरे बाजीराव पेशवे तक्तारूढ झाले तेंव्हा सोन्यारूप्याची फुले उधळण्यात आल्याची नोंद आहे.[१४] सौभाग्यवती राधाबाई यांचा मृत्यू झाला तेंव्हा त्यांच्या अंगावरील दागिन्यांसह त्यांचे दहन केले ते दागिने नथ, गळसरी, बुगडया, सुंकली, जोडवी, विरोद्या, अडकवळी, नग, वैळी, पैकी, आवळा १५ इ. होते.

रामचंद्रपंत आमात्य यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तीन पुत्रांत मिळकतीचे विभाजन झाले त्यावेळी त्यांच्या देव्हाऱ्यात ज्या देवांच्या मूर्ती होत्या. त्यांनाही सोन्याचे अलंकार होते याचा उल्लेख आहे. त्यामध्ये कुडक्या, पोंची, पाचेचे पदक, मोत्याच्या माळा, धुगधुगी, हिरकण्याचे पदक, सोन्याचा कडदोरा, साकळया जोड, रूळजोड, ताईतांचे प्रकार, मोत्यांचे पेंडे, कापजोड, बिजवरा, चंद्रकार, बाळयाजोड, दुलडी सर, टाकण बाळया १६ असे निरनिराळे अलंकार निरनिराळया देवांच्या अंगावर घातलेले उल्लेख आहेत.

आपली इच्छा पूर्ण व्हावी म्हणून त्याकाळी सुध्दा देवदेवतांना नवस केले जात होते. सवाई माधवराव पेशवे जन्माल्या नंतर केलेला नवस पूर्ण केल्याची माहिती मिळते. त्यामध्ये देवांना मुखवटे, तुरे, कंठी, कडी व फुले असे अलंकार अर्पण करून नवस पूर्ण केला. तसेच बाळाजी बाजीराव पेशव्यांची पत्नी गोपिकाबाईने कोल्हापूरच्या महालक्ष्मीस नवस केला होता तो '' जुन्या मोहरा मोडून पावणे चोवीस तोळे दोन गुंजा वजनाचे सोन्याचे चार चुडे केले.१७ अशा प्रकारचा नवस फेडल्याचा उल्लेख आहे.

***सारांश –***

पेशवेकाळात परिधान करीत असलेल्या अलंकारांची भरपूर माहिती निरनिराळया ऐतिहासिक कागदपत्रे,

जुने वाड्.मय साहित्य, अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे, संदर्भ ग्रंथ इ. तून मिळते. पेशवे काळात वस्त्रे, अलंकार, दागदागिने देऊन सन्मान करणे हे मोठेपणाचेच लक्षण समजले जात होते. स्त्री व पुरूष दोन्हीही दागदागिने व अलंकार परिधान करित असत. त्यात हिंदू स्त्रिया या चंद्रकोर, बिजवरा, बुगडया, बाळया, कुंडी, नथ, मोरणी, मंगळसुत्र, वज्रटीका, ठुशी, कंठा, मोहनमाळ, पाटल्या, गोठ, तोडे, जवे, कांकणे, बांगडया, वांकी, जोडवी, मासोळया, वाळे, गेंद इ. हिंदू स्त्रिया वापरीत तर लातकान, चांदतारा, मोर, टीका, पांतबालीया, करणफुल, झुमका, बुगडी, मुरंकी, कांत, दानिया, तुलस्सी पातीया, आश्रफीका हार, चंदनहार, बाझुबंद, जहांगिरी, कंगण, अंगठी, कदयार, मकोडा, कामनी, पैझेब, बिचवा इ. मुस्लिमस्त्रिया दागदागिने व अलंकार परिधान करित असत. तर पुरूष शिरपेंच, कलगीतुरा, मोत्याचा हार, कानात चौकडा, गळयात मोत्याच्या व पाचेच्या माळा हातात पोंच्या अशी अलंकार परिधान करीत.

सरदारांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिस म्हणून द्यावयाचे असो अथवा कोणाला भेटावयाला जायचे असो. देवाला नवस फेडण्यासाठी तसेच जन्मापासून मृत्यूपर्यंत पेशवेकाळात प्रत्येकानी अलंकार व दागदागिन्याचा उपयोग केलेला आपणास आढळून येतो. आजच्या काळातील अलंकारापेक्षा कितीतरी पटीने जास्त अलंकार व दागदागिने पेशवाईत स्त्रिया व पुरूष वापरित होते. आजच्या दागदागिने व अलंकाराचे उगमस्थान हे पेशवेकाळात आढळून येते. यावरून असे लक्षात येते की पेशवेकाळात दागदागिने व अलंकाराला महत्वपूर्ण स्थान होते.

***संदर्भ –***

१)संपा. प्रका. साने का. ना., थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, दुसरी आवृत्ती शके १८१५ पृ.१६
२)संपा. पारसनीस द. ब., बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, भाग १ ला, मुंबई १९०७. पृ. ९८,९९
३)संपा. मेहंदळे खंडेराव चिंतामण वगैरे - भारत इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला, पु. २० वे शके १८३६. पृ. १६
४)पेशवे दप्तर १५, मुंबई १९३१. पृ. ८६
५)गोगटे, चिं. ग. , नानासाहेब पेशव्यांचे चरित्र, १९०८ पृ. ३०६
६)पारसनीस द. ब. इतिहाससंग्रह, पु ६ वे मे-जून, जुलै १९१५ अंक १०/११/१२ पृ. १३४
७)संपा साने का. ना. - पेशवा माधवराव १ भाग १ ला मुंबई १९११. पृ. १४६
८)पेशवे दप्तर १६ - मुंबई १९३१, पृ. १०६
९)संपा. राजवाडे वि. का. - मराठवाडयाच्या इतिहासाची साधने खंड १३ व १४, पुणे जाने १९९८ पृ. ५५
१०)संपा. कुलकर्णी भीमराव, पेशव्यांची बखर, पुणे, जुन १९८७, पृ. ७२
११)कित्ता - पृ. ७४
१२)इतिहास संग्रह पु. २ रे, मते १९१०, अंक १० वा, पृ. ८०
१३)खरे वा. वा. , ऐतिहासिक लेखनसंग्रह भाग ६ वा, पुणे शके १८३८, सन. १९१६, पृ. ४६२७
१४)संपा. रा ग चि वाड, दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, पुणे १९०८, पृ. ११
१५)संपा. ग चि वाड, क्र. २३५, पृ. २६
१६)संपा. पवार अप्पासाहेब, ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड - २, कोल्हापूर १९७०, पृ. २१-२६
१७)पेशवे दप्तर ११, पृ. १५९